# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २०/०९/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील कृष्णा नदी गणेशपुर शिवार येथे दि. १९/०९/२२ चे ११.०० वा. चे पुर्वी **दिपक विठोबाजी गाईकी (मृतक), वय ५० वर्ष, रा.वार्ड नं.३ टाकळघाट** हे सकाळी कामावर जातो असे म्हणुन घरून निघुन गेले. रात्री पर्यंत घरी परत आले नाही. म्हणुन इकडे—तीकडे त्यांचा शोध घेतला मिळुन न आल्याने पोस्टे. एमआयडीसी बोरी येथे हरविल्या बाबत तक्रार दिली. पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे मी.सी.क्र.३९/२२ दि. १७/०९/२२ नोंद असुन दिं. १९/०९/२२ चे ११.०० वा. पुर्वी कृश्णा नदी गणेशपुर शिवार येथील नदीच्या पाण्यात दिपक गाईकी यांचे प्रेत तरंगताना मृत अवस्थेत मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— विजय विठोबाजी गाईकी, वय ५१ वर्ष, रा.वार्ड नं.३ टाकळघाट यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रवीण श्रीराम मो नं. ९८३४२४५९०५ हे करीत आहे.

२) पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत १४ कि. मी अंतरावरील मौजा चांपा पाटनसावंगी ता. सावनेर येथे दि. १९/०९/२०२२ चे १४.०० वा. सुमारास **सुखदेव लक्ष्मणराव भड(मृतक), वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र. ३, चांपा पाटनसावंगी** यांना पाच ते सहा वर्षापासुन ब्रेन कॅन्सर ची बिमारी होती. त्याचे ऑपरेशन सुद्धा झाले होते व त्यांना लखवा सुद्धा मारला होता. त्यांनी सदर त्रासाला कंटाळून फवारणी करीता घरी ठेवलेली विषारी औषध प्राशन केले. त्यांची प्रकृती खराब झाल्यामुळे त्यांना उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे नेले असता वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— दिवाकर नागोरावजी भड, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र. ३ चांपा पाटणसावंगी ता. सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार संदीप नागरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर